# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**


**No,CGRF/AZ/U/89/2008/10** **Date :-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer ,**
**O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Shivgi Dhondiba Kamble, Government Qurter, IInd floor, Nizam Banglow, Cantonment,, Behind Post Office, Aurangabad.
**(Consumer No. 490011470910)**

**Dear Sir,**

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from** Shri Shivgi Dhodiba Kamble, Government Qurter, Iind floor,Nizam Banglow,,Cantonment,Behind Post Office, Aurangabad.

The consumer has requested the Forum for passing interim order for reconnection of his electricity supply which has been disconnected without giving any notice and for no arrears on his name.

You are requested to submit your reply on the application of the consumer at the time of hearing .

**The hearing is fixed on 22.02.2008 at 11.30 hrs .**

**Encl:A/A**

.

**Copy to**
Shri Shivgi Dhondiba Kamble,
Government Qurter, IInd floor, Nizam Banglow,
Cantonment,, Behind Post Office,
Aurangabad.

**BEFORE THE CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM**
**AURANGABAD ZONE, AURANGABAD**

**( Case No. CGRF/AZ/AUR/U/52/2007/21 ).**

**Shri Rahul S.Dhanedhar -- Consumer Complainant.**
**( Con.No. 490011523854)**

**V/s**

**MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION COMPNAY LTD.**
**The Distribution Licensee.**

**Date:- 21.08.2007**

**Sub**: Grievance under the Maharashtra Electricity Regulatory Commission, (Consumer Grievance Redressal Forum and Ombudsman) Regulations, 2006

**INTERIM ORDER**

The consumer has filed an application in the Forum along with all the relevant bills issued by Distribution Licensee . The consumer has paid all the bills till May 2007. The Distribution Licensee issued him bill for the period 5.6.07 to 5.7.07 for Rs. 1,50,715/. Aggrieved by this , consumer requested the Forum to direct the D.L. not to disconnect his electricity supply by way of interim order.

On hearing both the parties, prima-facie, Forum observed that the bill issued by the D.L. for the period 5.6.07 to 5.7.07 is not correct and therefore as per provision No.6.5 of the Regulation , hereby direct the D.L. not to disconnect the electricity supply of the consumer.

This Interim order shall be subject to final decision on the grievance of the consumer, that may be passed.

| ( V.G. Joshi ) | (H.A.Kapadia) | ( V.A.Hambire) |
|---|---|---|
| Member/Secretary | Member | President |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/अेयुआर/यु/८९/२००८/१०**
**तक्रार दाखल दिनांक ;-१८/०२/२००८**
**निकाल दिनांक ;- १७/०४/२००८**

**श्री शिवाजी धोंडिबा कांबळे ,**
**३/११, कावेरी, दुसरा मजला,**
**निझाम बंग्लो, पोष्ट ऑफिस च्या मागे,**
**छावणी,औरंगाबाद.**

**अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**शहर मंडळ, औरंगाबाद.**

**विषय ;- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल)विनियम २००६च्या अंतर्गत गा-हाणे.**

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र. विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल) विनियम २००६च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दिनांक १८/०२/२००८ रोजी दाखल

केलेल्या गा-हाण्याची प्रत दिनांक १८/०२/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) किंवा नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात

१) ग्राहकाने दाखल केलल्या तक्रारीचा सारांश खालील प्रमाणे आहे.

अर्जदार हे शासकीय कर्मचारी असून त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून राहण्यासाठी शासकीय निवासस्थान देण्यात आलेले आहे.अर्जदाराना देण्यात आलेला ग्राहक क्रमांक ४९००११४७०९१० असा आहे. महावितरण कंपनीतर्फे जून २००५ पर्यंत देण्यात आलेले वीज बिले त्यांनी नियमीतपणे भरलेली आहेत. ऑगस्ट २००५ मध्ये त्यांना रुपये १२१०/- चे वीज बिल देण्यात आले जे चुकीचे असल्यामुळे त्यांनी संबंधीत अधिका-याकडे तक्रार केली. त्यांच्या तक्रारीचे निराकरण न करता त्यांना या बिलापोटी रुपये ५००/- भरण्याचे सांगण्यात आले त्यानंतरही पुढिल बिले दुरुस्ती न करता महावितरण कंपनीतर्फे त्यांना देण्यात आली व या थकीत चुकीच्या वीज बिलापोटी दिनांक २९/१२/२००५ रोजी अर्जदाराच्या म्हणन्यानुसार त्यांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला. त्या दिवशी त्यांच्या मीटर वरील रिडिंग ही ००६५९ अशी होती. यानंतरच्या काळात नोव्हेंबर २००६ पर्यंत त्यांना कोणतेही वीज बिल देण्यात आले नाही. अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या तक्रारीत दिनांक ११/०७/२००७ रोजी त्यांचे मीटर महावितरण कंपनीकडून काढण्यात ा आले. त्यांनी अनेकवेळा पाठपुरावा केल्यानंतर त्यांना महावितरण कंपनीकडून १०८३०/- रुपयाचे वीज बिल देण्यात आले व या बिलापोटी अर्जदाराने रुपये ४०००/-भरल्यानंतर दिनांक २९/०८/२००७ रोजी त्यांना नविन मीटर देण्यात आले व त्याचा खंडित केलेला वीज पुरवठा पुनर्जोडणी करुन देण्यात आला.

अर्जदाराचे हे मीटर तो राहत असलेल्या नविन शासकिय निवासस्थामध्ये बसविण्यात आले. त्यानंतर त्यांना कोणतेही वीज बिल न देता दिनांक २७/११/२००७ रोजी त्यांचे मीटर पुन्हा काढण्यात आले व त्याजागी पुन्हा दुसरे नविन मीटर बसविण्यात आले. अर्जदाराने महावितरण कंपनीतर्फे देण्यात आलेल्या चुकीच्या वीज बिलापोटी मंचात तक्रार दाखल केली असून महावितरण कंपनीस मीटर वरील नोंदीप्रमाणे सुधारीत वीज बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारी सोबत मंचास अंतरिम आदेशाद्वारे त्यांना देण्यात आलेल्या चुकीच्या वीज बिलामुळे खंडित केलेला वीज पुरवठा पुनर्जोडणी करुन देण्याची विनंती केली आहे. अर्जदाराने केलेल्या या अर्जावर दिनांक २२/०२/२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली दिनांक २२/०२/२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री शिवाजी कांबळे व नोडल अधिकारी श्री एस.जी. पवार उपस्थीत होते. मंचासमोर दाखल झालेल्या कागदपत्रावरुन प्रथमदर्शनी, अर्जदारास देण्यात आलेले बिल हे चुकीचे असल्याचे दिसून येत असल्यामुळे त्याचप्रमाणे अर्जदारास वीज पुरवठा खंडित करतांना कोणतीही लेखी नोटीस देण्यात आलेली नसल्याचे आढळून आले. वरिल निरीक्षणावरुन मंचाने अर्जदाराचा वीज पूरवठा २४ तासाच्या आत पुनर्जोडणी करण्याचा अंतरिम आदेश पारीत केला.

३) दिनांक ११/०३/२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री कांबळे तसेच नोडल अधिकारी श्री एस.जी.पवार उपस्थीत होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराच्या तक्रारीबाबत कोणतेही कागदपत्रे दाखल न केल्यामुळे त्यांना स्थळ पाहणी अहवाल, मीटर बदलीचा अहवाल तसेच वीज पुरवठा खंडित करतांना देण्यात आलेली नोटीसीची प्रत मंचात दाखल करण्याचे सांगण्यात आले व पुढील सुनावणी दिनांक १८/०३/२००८ रोजी ठेवण्यात आली.

४) दिनांक १८/०३/२००८ रोजी अर्जदार व नोडल अधिकारी

उपस्थीत होते. नोडल अधिका-यांनी त्यांना संबंधीत विभागाकडून या तक्रारीबाबत कोणतेही कागदपत्रे मिळालेली नसल्यामुळे सुनावणीची तारीख पुढे वाढविण्यासंबंधी अर्ज दाखल केला. नोडल अधिका-याची विनंती मान्य करुन पुढील तारीख २७/०३/२००८ रोजी सुनावणी घेण्याचे निश्चीत केले.

५) दिनांक २७/०३/२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी नोडल अधिकारी यांनी स्थळ पाहणी अहवाल, मीटर बदली अहवाल तसेच वीज पुरवठा खंडित करण्यासाठीची नोटीस यांच्या प्रती मंचात दाखल केल्या ज्याची एक प्रत अर्जदारास देण्यात आली. अर्जदाराचे व नोडल अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर सदरील प्रकरण आदेशासाठी ठेवण्यात आले.

६) अर्जदार व नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या कागदपत्रावरुन तसेच सी.पी.एल.वरुन असे आढळून येते की, एप्रिल २००५ पर्यंत महावितरण कंपनी तर्फे देण्यात आलेल्या वीज बिलाबाबत कोणताही वाद नाही. जुन २००५ मध्ये त्यांना ३६४ युनिट वीज वापराचे रुपये ११८ - ५६/- बिल देण्यात आले. एप्रिल २००५ चे वीज बिल मीटर वरील नोंदीप्रमाणे न आकारता ते ६४ युनिट वापराचे देण्यात आले. जून २००५ मधील वीज बिल हे प्रत्यक्षात फेब्रुवारी ते मे२००५ या चार महीन्याच्या वीज वापराचे आसल्याचे आढळून येते. जे की योग्य असल्याचे दिसते. त्याचप्रमाणे जुन २००५ मध्ये मीटर क्रमांक ८९०५७१५३ हे बदलण्यात येऊन त्याजागी नविन मीटर क्रमांक ०१२७८७९८ हे बसविण्यात आले. या बदलण्यात आलेल्या मीटरची रीडिंग ही ०००४ अशी असल्याचे दिसते. जुलै २००५ ते नोव्हेंबर २००५ या काळात अर्जदारास वरील मीटरच्या नोंदीप्रमाणे वीज बिल आकारण्यात आल्याचे व ते योग्य असल्याचे आढळून येते.

डिंसेंबर २००५ या महीन्यात मागिल रिडिंग ४४३ व चालू

रिडिंग १३२० अशी दाखवून अर्जदारास ८७७ यूनिट वीज वापराचे बिल आकारण्यात आले. जानेवारी २००६ ते नोव्हेबर २००६ या काळात चालू रिडिंग १३२० व मागिल रिडिंग १३२० अशी दाखवत त्यांना सरासरीच्या आधारावर वीज बिल आकारण्यात अल्याचे आढळून येते. डिंसेंबर २००६ ते जानेवारी २००७ या काळात त्यांना ३० युनिट वीज वापराचे तसेच फेब्रुवारी २००७ या महिन्यात २० युनिट वीज वापराचे बिल आकारण्यात आले. मार्च २००७ ते जुलै २००७ या काळात त्यांना मीटर ची मागील व चालू रिडिंग ६५९ व ६५९ अशी दाखवत बिल आकारण्यात आले.ऑगस्ट २००७ मध्ये अर्जदारास जुने मीटर क्रमांक ०१२७८७९८ हे बदलून त्या जागी नविन मीटर क्रमांक ५२६३११ हे बसविण्यात आले. दिनांक २५/०८/२००७ रोजीच्या मीटर बदलीच्या अहवालचे निरिक्षण केल्यावर जुन्या मीटर वरील रिडिंग ६५९ अशी दर्शविली असून नविन मीटरची सुरुवातीची रिडिंग ही ०००२ अशी दाखविली असल्याचे आढळून येते. अर्जदारास त्यापुढील काळातील वीज बिले ही नविन मीटर च्या नोंदीप्रमाणे देण्यात आल्याचे आढळून येते.

(७) वरील निरिक्षणावरुन मंचास असे आढळून येते की, नोव्हेबर २००५ पर्यंत अर्जदारास देण्यात आलेली वीज बिले ही बरोबर आहेत. डिंसेंबर २००५ ते जुलै २००७ या काळात अर्जदारास चुकीचे वीज बिल आकारण्यात आल्याचे दिसून येते. दिनांक २५/०८/२००७ रोजी मीटर बदलतांना जुन्या मीटरची (मीटर क्रमांक १२७८७९८) रिडिंग ही ६५९ अशी असल्याचे दिसून येते. या वरुन डिसेंबर २००५ ते जुलै २००७ या काळातील वीज बिले चुकीची असल्याचे स्पष्ट होते.

अर्जदाराने आपल्या तक्रारीत त्याचा वीज पुरवठा २९/१२/२००५ रोजी खंडित केल्याचे व ते २९/०८/२००७ रोजी पुनर्जोडणी करुन देण्यात आल्याचे म्हटले आहे. नोडल अधिकारी यांनी या बाबत आपले

कोणतेही म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे २९/१२/२००५ ते २९/०८/२००७ या काळात वीज पुरवठा खंडित होता हे अर्जदाराचे म्हणणे मान्य करण्यात येत आहे.

मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्जदारास नोव्हेंबर २००५ पर्यंत आकारण्यात आलेली वीज बिले योग्य असून त्या पूढील काळातील सर्व वीज बिले रद्द करण्यात येत आहेत.

२) डिसेंबर २००५ ते ऑगस्ट २००७ या काळात वीज पुरवठा खंडित असल्यामूळे फक्त स्थिर आकार लावून अर्जदारास सुधारीत वीज बिल आकारण्यात यावे.

३) नोव्हेंबर २००५ मध्ये चालू रिडिंग व दिनांक २५/०८/२००७ मीटर बदलतांना असलेली रिडिंग (६५९-४४३ - २१६ युनिट) चा वापर झाल्यामुळे याचे बिल सुधारीत बिलात समाविष्ट करण्यात यावे.

४) वरिल प्रमाणे सुधारीत बिल देतांना डिंसेंबर २००५ पासून कोणताही व्याज वा दंड आकारण्यात येवू नये.

५) अर्जदाराने वीज बिलापोटी भरलेल्या रक्कमेची वजावट या सूधारीत बिलात करावी.

६) सप्टेंबर २००७ व त्या पुढील सर्व वीज बिले मीटर वरील नोंदीप्रमाणे आकारण्यात यावे.

७) महावितरण कंपनी ने वरीलप्रमाणे अर्जदारास, ३० दिवसाच्या आत, सुधारीत वीज बिल द्यावे व ते अर्जदाराने१५ दिवसाच्या आत भरावे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **विजय गो. जोशी** | **विष्णु अ. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

२००८/१०

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/एयुआर/यु/८९/२००८/१०** **दिनांक ;-**

**प्रति,**

**१) कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद.**

**२) श्री शिवाजी धोंडिबा कांबळे ,**
**३/११, कावेरी, दुसरा मजला,**
**निझाम बंग्लो, पोष्ट ऑफिस च्या मागे,**
**छावणी,औरंगाबाद.**

**विषय ;-** क्र.सिजीआरएफ/एझेड/अेयुआर/यु/८९/२००८/१०
गा-हाण्याचा आदेश.

वरिल विषयातील गा-हाण्याचा आदेश या पत्रा सोबत जोडला आहे.

ग्राहकास, जर आदेश मान्य नसेल तर तो विद्युत लोकपाल ( खाली दिलेला पत्ता ) यांच्याकडे आपले गा-हाणे आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आंत दाखल करु शकता.

सोबत ;- वरिल प्रमाणे.

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा ईमारत,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**